महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना / १९ /२०२३ दि. ४/०२/२०२३

## –: वाहतुक नियंत्रण अधिसुचना :–

**ज्याअर्थी,** ठाणे शहरातील वागळे वाहतुक उपविभागाचे हद्दीत दि. ०५/०२/२०२३ रोजी सकाळी ०५:३० ते ११:०० वाजेपावेतो **'ज्यूपीटर हॉस्पिटल फाउंडेशन' मॅरेथॉन स्पर्धा** चे आयोजन करण्यात येणार आहे. सदर कार्यक्रमाकरीता मोठया प्रमाणात नागरीक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. सदर कार्यक्रमामुळे वाहतुक कोंडी होवु नये या करिता उपवन कडुन रेमंड कंपनीकडे येणा–या मार्गावरील वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असुन सदर परिसरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चीत रहावी याकरीता, आम जनतेच्या सोयीसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे :–

**प्रवेश बंद** :– १) येऊर गेट – शास्त्रीनगर – वर्तकनगर कडुन रेमंड – कॅडबरी जंक्शन कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना शास्त्रीनगर चौक येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– सदरची वाहने कॅडबरी जंक्शन कडुन वर्तकनगर – शास्त्रीनगर कडे येणा–या वाहिनी वरील एका लेनमधुन शास्त्रीनगर येथे येउन पुढे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद** :– २) देवदयानगर – शिवाईनगर – बिरसामुंडा चौक कडुन कॅडबरी जंक्शनकडे जाणा–या वाहनांना देवदयानगर कट येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग** :– देवदयानगर – शिवाईनगर कडुन येणारी वाहने ही बिरसामुंडा चौक – बेथनी हॉस्पीटल येथुन इच्छीत स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग** :– येउर गेट कडुन येणारी सर्व प्रकारची वाहने ही उपवन तलाव पायलादेवी मंदिर – बिरसामुंडा चौकातुन पुढे इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसचुना ही पोलीस वाहने, रूग्ण वाहिका, फायर ब्रिगेड व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने तसेच मॅरेथॉन स्पर्धेतील वाहनास लागू राहणार नाही. सदरची वाहतुक अधिसचुना ही दि. ०५/०२/२०२३ रोजी सकाळी ०५.३० ते रात्रौ ११.०० पावेतो अंमलात राहिल.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसूचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर**
– जिल्हाधिकारी, ठाणे
– आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

CamScanner

- अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
- प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
- पोलीस उप आयुक्त,परिमंडळ–५, ठाणे.
- पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
- परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालीका ,ठाणे.
- विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
- नियंत्रण कक्ष,ठाणे शहर
- ठाणे पोलीस पत्रक

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी.

स.पो.आ. ठाणे वाहतूक विभाग,/पोनि वागळे, कापुरबावडी, राबोडी, नौपाडा, वाहतूक उपविभाग.

CamScanner